**किरकोळ अर्ज १०/२०२६**
**पंचफुला वि. निरंक**
**नि.०९ पुढे..**

**अर्जदारतर्फे साक्षदार क्र.१ (अर्जदार स्वतः) यांची सरतपासणी विधिज्ञ पी.डी.भगत यांच्या मार्फत शपथेवर सुरु –**

माझ्या सरतपास शपथपत्रातील मजकूर माझ्या वकिलांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला असून सदर मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही असुन त्यावर मी वाचुन व समजुन सही केली आहे. माझ्या पुराव्याचे शपथपत्र **निशाणी क्र.०९** वर आहे.

मी पुरावाकामी **निशाणी क्र.०४** वर खालील दस्त दाखल केले आहेत.

१. मी अभिलेखावर माझी बहिण आशा व तिचे पती श्यामराव यांच्या मृत्युपत्राची मूळ प्रत दाखल केली आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र.१० व ११** देण्यात येते.

२. मी अभिलेखावर माझे आधारकार्डाची सत्यापित प्रत दाखल केल्या आहे. त्यास **निशाणी क्र.१२** देण्यात येते.

३. मी अभिलेखावर पोलीस पाटील यांनी दिलेल्या वारसान प्रमाणपत्राचा अहवाल दाखल केलेला आहे. त्यास **निशाणी क्र.१३** देण्यात येते.

४. मी अभिलेखावर मकान कर पावती दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र.१४** देण्यात येते.

५. मी अभिलेखावर दि.०२/०४/२०२६ रोजी दैनिक पुण्यनगरी वर्तमानपत्रामध्ये दिलेल्या जाहीरातीची व सदर जाहीरातीचा बिलाची मूळ प्रती दाखल केले आहे. जाहीरातीचा बिलाची मूळ प्रतिस **निशाणी क्र.१५** देण्यात आला व जाहीरातीस **आर्टिकल-अ** देण्यात आले.

**सरतपास संपला**
**उलटतपास : निरंक**

**श्रवणोत्तर स्विकृत**

दि. ०७/०५/२०२६

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.05.07 16:40:17 +0530

(एस.आर.सातभाई)

दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

सेलू.